नि.क्र.सी–

# तक्रार (युएलपी) क्र.२० / २०१९

## साक्षीदार क्र.१ जाबदारतर्फे

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | प्रविण उत्तम पाटील |
| वय | – | ३८ वर्षे |
| व्यवसाय | – | नोकरी, रा.प. महामंडळ |
| राहणार | – | सांगली. |

........

## सरतपास – विधिज्ञ श्री एन.एम. जगदाळे, जाबदारतर्फे

१. मी तक्रारदारास ओळखतो. तकारदार आबासाहेब पांडुरंग ऐवळे, सुरक्षा रक्षक म्हणून मिरज आगारात कार्यरत आहेत. तक्रारदाराची प्रथम नेमणूक चालक म्हणून सांगली विभागात झाली होती. त्यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक, सांगली यांचेकडून चालक पदासाठी पात्र ठरल्याने त्यांना दि.०७/०१/१९९८ रोजी नेमणूक जत आगारात देण्यात आली होती. तक्रारदार दि.०७/०१/१९९८ रोजी मासिक वेतनश्रेणीवर घेण्यात आले होते. तक्रारदार यांनी चालक पदावर काम करीत असताना त्यांच्या ३१/१०/२०१२ रोजी भारती हॉस्पीटल, मिरज येथे केलेल्या वैद्यकीय तपासणी केली असता त्यांनी कलर व्हीजन डिफेक्टीव्हीटी आढळून आली.त्यानुसार त्यांना अपात्र करण्यात आले व त्यांना स्थायी वैद्यकीय बोर्ड, ससून हॉस्पीटल पुणे येथे पुढील तपासाणीसाठी पाठविण्यात आले. पुणे येथील बोर्डाने तक्रारदारला बीओआर/१३/२०१३ दि०८/०१/२०१३ नुसार तक्रारदाराला चालक पदाकरिता पात्र ठरविले आहे. त्यानंतर तक्रारदाराने ससून हॉस्पीटलने दिलेला निर्णय मान्य नसल्याने जत आगार यांचेमार्फत दि.२२/३/२०१३ रोजी विनंती अर्ज करुन पुन्हा नेत्र तपासणी करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार

तक्रारदाराला सर जे.जे. समूह रुग्णालाय, मुंबई यांचेकडे वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले. त्या तपासणीत तक्रारदारला डिफेक्टीव्ह कलर व्हीजन या कारणास्तव चालक पदाकरिता अपात्र केले. त्यानंतर तक्रारदाराने पर्यायी नोकरीसाठी अर्ज सादर केला. त्या अर्जामध्ये सुरक्षारक्षक या पदात पर्यायी नोकरी मिळणेसाठी विनंती केली. जिल्हा शल्यचिकित्सक, सांगली यांच्या दि.२६/१२/२०१२ च्या वैद्यकीय दाखल्यानुसार तक्रारदाराला सुरक्षारक्षक पदात पात्र असलेबाबतचा वैद्यकीय दाखला देण्यात आला. तक्रारदाराला चालक पदातून पर्यायी नोकरीवर सुरक्षारक्षक या पदी दि.२४/११/२०१३ रोजी विभागीय कार्याशाळा, मिरज येथे सुरक्षारक्षक पदी पर्यायी नोकरी दिली.

२. मध्यवर्ती कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.प/कर्मवर्ग/आस्था/४८६/ई/३६२१ दि.२९/०७/२०१६ यान्वये जे कर्मचारी अथवा चालक रंगांधळेपणा या कारणास्तव अपात्र झालेले आहेत त्यांची ॲनामॉलस स्कोपिक मशिनद्वारे सुरक्षारक्षक या पदी हजर झालेल्या कर्मचा–यांची तपासणी करुन तपासणीअंती जर रंगांधळेपणा आढळून न आल्यास त्यांना चालक पदावर नेमणूक देण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या, तसेच रंगांधळेपणा आढळून आल्यास त्यांना स्वच्छक पदामध्ये पर्यायी नोकरी देण्याबाबत सूचना देण्यात आल्या परंतु ज्या कर्मचा–यांनी चालक पदामध्ये रंगांधळेपणावर विसंबून ज्यांनी पर्यायी नोकरी स्वीकारली त्यांचा रंगांधळेपणा आढळून आला नाही तर त्यांच्यावर प्रमादीय कारवाई करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या. दि.२९/०८/२०१६ च्या पत्रानुसार तक्रारदाराला वैद्यकीय तपासणीला जे.जे.समूह रुग्णालय ॲनामॉलस स्कोपिक तपासणीकरित पाठविण्यात आले. त्यानुसार मा. अध्यक्ष बोर्ड ऑफ रेफरी यांनी जा.क्र.ओपीएच/बीआर/३३/१४४/२०१७ दि.१९/१०/२०१६ नुसार Fit to Perform the Duties of Driver असे नमूद करुन चालक पदासाठी पात्र ठरविले. त्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सक, सांगली येथे चालक पदासाठी पाठविले असता त्यांनी कामगार न्यायालयात तक्रार युएलपी क्र.१३/२०१७ दाखल केली. कामगार न्यायालयात निकाल अंशत: मंजूर झालेला

आहे. सदर कामगार न्यायालयाच्या आदेशात तक्रारदारावर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश झालेले असलेने त्यांच्यावर पुढील कारवाई सुरु करण्यात आली व तक्रारदार सध्या सुरक्षारक्षक या पदावर कार्यरत आहेत. औद्योगिक न्यायालयात तक्रारदाराची तक्रार नामंजूर झाली होती त्याविरुध्द त्याने मा. उच्च न्यायालयातून स्थिगिती मिळविली होती. त्यानंतर तक्रारदारावर कारवाई करण्याचे मार्गदर्शन प्राप्त झाले.

**विधीज्ञ श्री मुतालिक, यांच्या विनंतीवरुन उलटतपासाकरिता तहकूब..**

सही/–

सांगली. (दि.मा. पाटील)

सदस्य,

दिनांक – ०५/०८/२०२४. औद्योगिक न्यायालय, सांगली